पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४४१ दिनांक - १८/०६/२०२३**

## गुन्हे शाखा,युनिट-४,पुणे शहर

## अपहरण करुन जबरी चोरी करणारे आरोपी जेरबंद

दिनांक १३/०६/२०२३ रोजी फिर्यादी हे लोहगांव स्मशान भुमी येथे रात्रीच्या वेळी रिक्षा घेऊन जात असताना,चार अनोळखी इसमांनी त्यांना काठीने,लाथा-बुक्क्यांनी मारहाण करुन त्यांचा मोबाईल हॅन्डसेट व रिक्षा क्र.एमएच/१२/जेएस/५८८५ ही जबरदस्तीने हिसकावुन त्याच रिक्षात फिर्यादी यांना धाक दाखवुन,बळजबरी शहरात इतरत्र फिरवुन पुन्हा मारहाण करुन अंधारात सोडुन,रिक्षा व मोबाईल फोन घेऊन आरोपींनी पोबारा केला. त्याबाबत विमानतळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२९४/२०२३,भा.द. वि.कलम ३६५,३९४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

गुन्हे शाखा,युनिट-४ कडील **सहा.पोलीस निरीक्षक,विकास जाधव, पोलीस अंमलदार,संजय आढारी, प्रविण भालचिम, विनोद महाजन, नागेशसिंग कुँवर** या पथकाने घटनास्थळ व आजुबाजुचे ठिकाणी उपलब्ध असलेले सी.सी.टिव्ही कॅमे-याचे फुटेज तपासले. त्या आधारे तपास करीत असताना, नमुद पथकास दिनांक १७/०६/२०२३ रोजी माहिती मिळालीकी,रिक्षा चालकास मारहाण करुन, त्यास पळवुन नेऊन लुटणारे अजिंक्य मोहिते व राहुल थोरात हे लोहगांव ते खराडी रोडवरील फॉरेस्ट पार्क जवळील नाल्याचे शेजारी चोरलेल्या रिक्षात बसलेले आहेत. नमुद माहिती पोलीस निरीक्षक,गणेश माने यांना दिली असता,त्यांनी बातमीप्रमाणे खात्री करुन कारवाई करणेचे आदेश दिले.

गुन्हे शाखा,युनिट-०४ चे पथकाने लोहगांव ते खराडी रोडवरील फॉरेस्ट पार्क लगत असलेल्या नाल्याचे जवळ चोरीची रिक्षा पार्क करुन बसलेले रेकॉर्ड वरिल **१)**राहुल राजु थोरात,वय २८ वर्षे,रा. विश्वराज हॉस्पिटल समोर,लोणी-काळभोर,पुणे **२)**अजिंक्य प्रकाश मोहिते,वय-२८ वर्षे,रा.पवार वस्ती, शिवराज कॉलनी,लोहगांव,पुणे यांना ताब्यात घेऊन त्यांचे ताब्यातुन चोरलेली बजाज-अॅटो रिक्षा क्र. एमएच/१२/जेएस/५८८५ व एक रेडमी कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट जप्त केला. त्यांचेकडे केलेल्या तपासात दाखल गुन्हा **३)**बबल्या ऊर्फ अजय अशोक कसबे,रा.वडार वस्ती,विश्रांतवाडी,पुणे **४)**अरुण राजु पिल्ले,रा.संतनगर,लोहगांव,पुणे यांच्या मदतीने लोहगांवातील स्मशान भुमीजवळ रिक्षा ड्रायव्हरला मारहाण करुन,त्यास रिक्षात सिट मागील बाजुस बळजबरीने बसवुन,त्याचे ताब्यातील रिक्षा व मोबाईल हॅन्डसेट जबरीने काढुन रिक्षा ड्रायव्हरचे अपहरण करुन,त्यास रिक्षात मारहाण करुन अंधारात सोडुन पळुन गेल्याचे सांगितले. दोन्ही अटक आरोपींविरुध्द यापुर्वी गुन्हे दाखल असुन ते सध्या जामिनावर आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री. संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे शाखा, श्री.अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतिश गोवेकर, पोलीस निरीक्षक,गणेश माने यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक,विकास जाधव, सहा.पोलीस फौज.महेंद्र पवार, पोलीस अंमलदार,संजय आढारी, प्रविण भालचिम, विनोद महाजन, नागेशसिंग कुंवर यांनी केली आहे.